# शिक्षकांच्या रिक्त पदांचा विद्यार्थ्यांना फटका

## नरखेड तालुक्यातील वास्तव, अधिकाऱ्यांची ९, तर शिक्षकांची ३० पदे रिक्त

सकाळ वृत्तसेवा

जलालखेडा, ता.१४: कोविडमुळे गत दोन शैक्षणिक सत्र शाळा बंद राहिल्या. ऑनलाइनच्या गोंधळात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. आता ऑफलाइन वर्ग सुरू झाले. मात्र शिक्षकांची कमतरता असल्याने दुहा तिची स्थिती निर्माण झाली आहे. ऑनलाइन वर्गामुळे शिक्षण विभागाला तारले असले तरी आता ऑफलाइनमुळे शिक्षण विभागाचे पितळ उघडे पडले आहे.

नरखेड तालुक्यात जिल्हा परिषदेच्या ७८ प्राथमिक शाळा तर



३५ उच्च प्राथमिक शाळा अशा एकूण ११५ शाळा आहेत. त्यामध्ये ४९६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

येथे मुख्याध्यापक, सहाय्यक व विषय शिक्षकांची ३४२ पदे मंजूर असताना ३१२ शिक्षक कार्यरत आहेत. ३० पदे रिक्त आहेत. यात उच्च श्रेणी मुख्याध्यापक १, पदवीधर भाषा शिक्षक ३ तर सहायक शिक्षकांची २६ पदे रिक्त आहेत. लॉकडाउनंतर जि. प. शाळांची पटसंख्या वाढली. आता ही पटसंख्या टिकविण्याची जबाबदारी शिक्षण विभागाची आहे. मात्र शिक्षकांची कमतरता असताना तालुका प्रशासनाने मौन बाळगले आहे.

### विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर ठेवायचे आहे लक्ष

ऑनलाइन शाळा बंद करून ऑफलाइन वर्ग दोन टप्प्यात सुरु करण्यात आले. शाळेत कोविड नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. अशावेळी मुलांचा ताप मोजणे, एका बाकावर एकच विद्यार्थी बसविणे, पटांगणात मुलांना एकत्र येऊ न देणे, आजारी मुलास शाळेत येऊ न देणे आदी बाबींवरही शिक्षकांना लक्ष ठेवायचे आहे.

> तालुक्यातील शिक्षकांच्या कमतरतेबाबत शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला आहे. मात्र अद्यापपर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. ग्रामविकास मंत्र्यांनाही याबाबत अवगत केले आहे. हा प्रश्न लवकरच मार्गी निघेल.
> -नीलिमा रेवतकर, सभापती, पं. स. नरखेड

### तालुक्यातील शिक्षण विभागातील सध्याची स्थिती

| पद | मंजूर पदे | कार्यरत पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| गट शिक्षणाधिकारी | १ | ० | १ |
| विस्तार अधिकारी | | | |
| जेष्ठ शिक्षण | २ | ० | २ |
| विस्तार अधिकारी | | | |
| शिक्षण कनिष्ठ अधिकारी | २ | १ | १ |
| केंद्रप्रमुख | १० | ४ | ६ |
| उच्च श्रेणी मुख्याध्यापक | ४ | ३ | १ |
| सहाय्यक शिक्षक | २६० | २३४ | २६ |
| भाषा विषय शिक्षक | ३७ | ३४ | ३ |
| विज्ञान विषय शिक्षक | ३७ | ३७ | ० |
| समाजशास्त्र शिक्षक | ४ | ४ | ० |

# केंद्रीय शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची ११ हजार पदे रिक्त

## विद्यापीठांची स्थितीही दयनीय : महाराष्ट्रात १० हजार पदे रिक्त

**आशिष दुबे**
लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** देशात उच्च शिक्षण आणि संशोधनाला चालना देण्याचे अनेक दावे केले जात असताना देशातील उच्च शिक्षणसंस्था वर्षानुवर्षे दुर्लक्षित असल्याचे वास्तव आहे. केंद्रीय विद्यापीठे, आयआयटी, आयआयएम, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठासह राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहायक प्राध्यापकांची ११ हजारांहून अधिक पदे रिक्त आहेत. ही आकडेवारी २०१९ सालची आहे. गेल्या दोन वर्षांत रिक्त पदांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

### केंद्रीय विद्यापीठातील रिक्त पदांची स्थिती (२०१९ पर्यंत)

| पदे | मंजूर पदे | भरलेली | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| प्राध्यापक | २,४२६ | १,१२५ | १,३०१ |
| सहयोगी प्राध्यापक | ४,८०५ | २,६२० | २,१८५ |
| सहायक प्राध्यापक | ९,८६१ | ७,७४१ | २,१२० |

**लोकमत समाचार एक्सक्लूसिव**

राष्ट्रीय पातळीप्रमाणे राज्यांमध्येही स्थिती चांगली नाही. येथेही हजारो शिक्षकांची पदे रिक्त आहेत. २०१७ पासून एकट्या महाराष्ट्रातील राज्यातील विद्यापीठांमध्ये १० हजारांहून अधिक (पान ७ वर)

### येथेही परिस्थिती चांगली नाही (वर्ष २०१९ पर्यंत)

| संस्था | रिक्त जागा |
|---|---|
| आयआयटी | ३, ८७६ |
| आयआयएम | ४०३ |
| इग्नू | १९० |
| महाराष्ट्रातील विद्यापीठ | १०,००० |